महाराष्ट्र शासन
वन विभाग

उप वनसंरक्षक, जळगांव वनविभाग, जळगांव यांचे कार्यालय
Dy.Conservator of Forests, Jalgaon Forest Division, Jalgaon
प्रशासकीय इमारत टप्पा-3 तळमजला, आकाशवाणी केंद्राजवळ. जळगांव -425 001
E-Mail dcfJalgaon@gmail.com Tel No. -0257- 2229840

# मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती करणेबाबत

## जाहिरात क्रमांक ०१/२०२५

उपवनसंरक्षक, जळगांव वनविभाग, जळगांव यांचे अधिनस्त क्षेत्र तथा जळगांव जिल्हाकरिता वन्यजीव संरक्षणार्थ वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील कलम-४ (१) मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार शासनामार्फत **मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती** करावयाची आहे. नियुक्तीसाठी पात्र उमेदवाराकडून केवळ जळगांव वनविभागाचे Email ID- dcfjalgaon@gmail.com या ई-मेल आयडी वर अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावी.

**१. ओळखपत्र**

**२. कायमचा पत्ता याबाबतचा पुरावा.**

**३. वन्यजीव संरक्षण, संवर्धन, मानव-वन्यजीव संघर्ष तसेच निसर्गात संकटग्रस्त, नामशेष होत चाललेल्या प्रजातीचे संवर्धन, संरक्षण इ. बाबत केलेल्या कामाचा तपशील.**

वरील जाहिरातीचे अनुषंगाने याद्वारा सूचीत करण्यांत येते की, वनसंरक्षण व वन संवर्धनाचे काम करणा-या तसेच मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याचे काम करणा-या उमेदवारांची/सेवाभावी संस्थांची वाढती संख्या विचारात घेऊन प्रत्येकाला वन्यजीव संरक्षणार्थ मानद वन्यजीव रक्षक म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी यासाठी मानद वन्यजीव रक्षक या पदाकरीता वन्यजीव संरक्षणार्थ केलेल्या कामासंबंधात स्वतंत्र प्रस्तावासह अर्ज मागविण्यात येत आहे. सदर प्रस्तावांवर उपवनसंरक्षक, जळगांव यांचे अध्यक्षतेखाली गठीत समिती मध्ये दोन सहायक वनसंरक्षक व कार्यालय अधिक्षक यांचे मार्फत छाननी करण्यात येईल.

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | उपवनसंरक्षक, जळगांव वनविभाग याकार्यालयाचे dcfjalgaon@gmail.com या ई-मेल आयडीवर अर्ज स्विकारण्याचा कालावधी | दि. १० एप्रिल २०२५ रोजी सांयकाळी ०६:०० वाजे पावेतो |
| २. | उपवनसंरक्षक, जळगांव यांचे मार्फत प्राप्त अर्जाची छाननी करणे. | दि. ११ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता |
| ३. | अंतिम अहवाल मा. वनसंरक्षक (प्रा.) धुळे यांना सादर करणे. | दि. ११ एप्रिल २०२५ रोजी सांयकाळी ०५:३० वाजता |

(प्रवीण ए.)
उप वनसंरक्षक
जळगांव वनविभाग, जळगांव.

Scanned with OKEN Scanner

टिप- १. आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास त्याबाबत वेळोवेळी https://mahaforest.gov.in या संकेत स्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. अशा सुचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्यांची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.

२. उमेदवारांनी प्रस्ताव सादर करताना ओळखपत्र व कायमचा पत्ता याबाबत पुरावा जोडणे बंधनकारक आहे.

प्रस्तृत जाहिरात ही संक्षिप्त जाहिरात असुन अर्ज स्विकारण्याची पध्दत, अर्हता, निवडीचा प्रक्रिया याबाबतचा सविस्तर तपशील https://mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याचे कृपया अवलोकन करावे. उमेदवारांना कोणताही पत्र व्यवहार करण्यात येणार नसुन वरील संकेतस्थळावर आवश्यक माहिती वेळोवेळी प्रसिध्द करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

## अटी व शर्ती

१. उमेदवारास वन्यजीव संवर्धनाची खरी काळजी असणे आवश्यक आहे.

२. निसर्गाच्या आणि वन्यजीव संवर्धनाच्या हिताला हानी पोहोचवणा-या कोणत्याही अपराधी कृत्यात सहभागी नसलेला व्यक्ती.

३. वन्यजीवांच्या व्यावसायिक शोषणात सहभागी असलेला कोणत्याही व्यक्तीचा विचार केला जाणार नाही.

४. वन व वन्यजीव विभागाचे यंत्रणेला मदत करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.

५. स्थानिक समुदायाशी संवाद साधुन त्यांना वन्यजीव संरक्षण व संवर्धनाचा संदेश पोहोचवण्यात सक्षम असणारी व्यक्ती.

वरील अटींच्या अधीन राहून सादर करावयाचे प्रस्ताव दिनांक १०/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०६:०० वाजे पावेतो उपवनसंरक्षक, जळगांव वनविभाग, जळगांव, प्रशासकीय इमारत टप्पा ३ आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव या ठिकाणी स्वत: किंवा टपालाने तीन प्रतित सादर करावेत. तसेच प्रस्तावाची सॉफ्ट कॉपी dcfjalgaon@gmail.com या ईमेल आयडी वर सादर करावे.

(प्रवीण ए.)
उप वनसंरक्षक
जळगांव वनविभाग, जळगांव.

Scanned with OKEN Scanner